**SNDT Women's University**
**Centre For Distance and Online Education**
Sir Vithaldas Vidyavihar, Juhu Tara Road,
Santacruz (W), Mumbai - 400 049, INDIA.

SNDT WOMEN'S UNIVERSITY Estb:1916
Re-Accredited with A+

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
**दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र**
सर विठ्ठलदास विद्याविहार, जुहू तारा मार्ग,
सांताक्रूज (प.), मुंबई-४०० ०४९, भारत.

Tel.: 91-22-2660 7758 / 2660 8193 ★ Mob.: 83696 07875 ★ E-mail : cde@sndt.ac.in ★ Website : https://sndt.ac.in/cde/

दू.शि.के./७५/२०२५-२६ / 178

दिनांक : १० सप्टेंबर २०२५ .

स्मरणपत्र VII

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षातील भारत सरकार शिष्यवृत्ती अर्जाबाबत---**

संदर्भ- १ -जा.क्र.सआसक/मुंउप/भासशि/२०२४-२५/२११३ दिनांक ०१/०८/२०२४.
२. दू.शि.के./७५/२०२४-२५/ २०६ दिनांक :१८ जानेवारी २०२५
३ दू.शि.के./ ७५/२०२५-२६ / ०७ दिनांक :०४ एप्रिल २०२५.
४. दू.शि.के./ ७५/२०२५-२६ / ६६ दिनांक :०२ जून २०२५
५. दू.शि.के./ ७५/२०२५-२६ /७६ दिनांक : १६ जून २०२५ .
६. दू.शि.के./ ७५/२०२५-२६ / ११० दिनांक : ०२ जुलै २०२५ .
७. दू.शि.के./७५/२०२५-२६ /१५५ दिनांक : ११ ऑगस्ट २०२५ .

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये ज्या विद्यार्थीनिनी दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, श्रीमती. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठामध्ये बी.ए. I, II, III, बी.कॉम. – I, II, III, एम.ए. – I, II, एम.कॉम. I, II वर्गांला राखीव प्रवर्गामध्ये राखीव प्रवर्गातील फी भरून प्रवेश घेतलेला होता. शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर लॉग इन करून ऑनलाईन अर्ज विहित मुदतीत दिनांक ३१ जुलै २०२४ पर्यंत सादर करणे अनिवार्य होते. ज्या विद्यार्थीनींनी ऑनलाईन अर्ज विहित मुदतीत सादर केलेला होता परंतू त्यांच्या अर्जामध्ये दुरस्ती असल्याकारणाने तो अर्ज दुरुस्तीसाठी परत (Sent Back to Student) पाठविलेला आहे. त्यामध्ये अद्यापही दुरुस्ती केलेली दिसून येत नाही.

MAHADBT संकेतस्थळावरून प्रसिद्ध करण्यात आलेल्या सुचनेनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनींना चुकीचा अर्ज दूरुस्त करून Re-apply करण्याकरिता **दिनांक ३० सप्टेंबर २०२५** पर्यंतचा कालावधी देण्यात आलेला आहे. तरी विद्यार्थीनिनी त्यांचा अर्ज शासनाने दिलेल्या विहित मुदतीत Re-apply करणे आवश्यक आहे. शिष्यवृत्ती अर्जामध्ये विहित वेळेत दुरुस्त न केल्यामुळे सदर अर्ज कालांतराने रद्द होतात आणि असे अर्ज समाज कल्याण विभागाकडून मान्य होत नाही त्यामुळे शिष्यवृत्ती अर्ज सादर न केल्यामुळे आपणास खुल्या प्रवर्गाची खालील उर्वरित फी भरावी लागेल.

सदर सूचना प्राप्त होवूनही आपण आपला अर्ज (Re-apply) **दिनांक ३० सप्टेंबर २०२५** पर्यंत सादर केला नाही तर आपणास नियमानुसार दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या कोणत्याही परीक्षेस बसता येणार नाही तसेच दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राद्वारे कोणत्याही शैक्षणिक कागदपत्राची पूर्तता केली जाणार नाही.

| **अ. क्र.** | **वर्ग** | **रक्कम (रुपयांमध्ये)** |
|---|---|---|
| १. | बी.ए. / बी.कॉम. –I | ४२३०/- |
| २. | बी.ए./ बी.कॉम. – II | ३९३०/- |
| ३. | बी.ए. / बी.कॉम. –III | ३९३०/ |
| ४ . | एम.ए./ एम.कॉम. – I | ५८७०/- |
| ५ . | एम.ए. / एम.कॉम. – II | ५५७०/- |

विद्यार्थीनीना सदर बाबतीत काही समस्या असल्यास दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राशी संपर्क साधावा.

- इमेल आय डी-socialwelfare@cde.sndt.ac.in , मोबाईल क्रमांक - ८३६९६०७८७५

धन्यवाद.

( डॉ. मंगेश कदम )
संचालक